सोमवारी सकाळी पावसाने विश्रांती घेतल्यानंतरही वसई तालुक्यातील भोयदापाडा, एव्हरशाईन सिटी, सनसिटी, अंबाडीरोड, सेंट्रलपार्क, सोपारा–स्टेशनरोड, लक्ष्मीबेन छेडा मार्ग, श्रीप्रस्था, साईनगर, पाटणकरपार्क, विराटनगर येथील मुख्य पाण्याखालीच राहिले. या रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचून राहिल्यामुळे शेकडो दुचाकी वाहने पाण्यात अडकून बंद पडली. ३ दिवस घरात अडकून पडल्यानंतर हजारो नागरिक दैनंदिन वस्तू घेण्यासाठी रस्त्यावर आले. मात्र, वस्तू तर दुरच त्यांची वाहने बंद पडून ती ढकलत न्यावी लागल्यामुळे आगीतून फोफाट्यात पडल्यासारखी त्यांची अवस्था झाली. याहून बिकट परिस्थिती तालुक्यातील व्यापारी आणि कारखानदारांची झाली आहे. सोमवारी सकाळी त्यांनी आपापली दुकाने आणि कारखाने उघडल्यानंतर दुकानातील सामान आणि कंपनीतील माल पाण्यात खराब झाल्याचे त्यांना दिसून आले. सोमवारचा संपूर्ण दिवस दुकानातून पाणी काढणे, सफाई करणे, मालाची व्यवस्था करणे आणि नुकसानीची आकेडमोड करण्यातच गेला. दरम्यान, पुरामुळे घरात अडकलेल्या भुईगांव शेवारवाडी आदिवासी पाड्यातील ग्रामस्थांना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बबनशेठ नाईक आणि नगसेवक पंकज चोरघे यांनी अन्नधान्य वाटप केले. तसेच समेळगांवातील इमारतींच्या तळमजल्यावर पाणी शिरल्यामुळे सुखकर्ता मित्र मंडळाने येथील शेकडो लोकांना जेवण पुरवले.

वसईच्या ससुनवघर सातीवली, नालासोपारा पेल्हार मार्गावर पाणी साचल्याने महामार्गा वाहतूक रोडावली आहे. तर पश्चिम रेल्वेच्या रुळावर सुद्धा पाणी साचल्याने रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. वसई किनाऱ्यावरील गावांत पाणी शिरून नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. महापारेषणच्या वसई येथील १०० एमव्हीए उपकेंद्रात पाण्याची पातळी वाढल्याने सुरक्षेच्या कारणास्तव तेथील विद्युत यंत्रणा रविवारी बंद ठेवण्यात आली याचा फटका वीजग्राहकांना बसला आहे.



वसईमध्ये पावसाने विश्रांती घेतली तरी बऱ्याच ठिकाणी रोडवर पाणी साचले आहे.

### गावांचा संपर्क तुटू नये, यासाठी उपाययोजनाची गरज

दरवर्षी जुलै महिन्यात अतिवृष्टी होते. महामार्गानजिकच्या असंख्य गावांचा वसई–विरार मुख्य शहरांशी तानसा, वैतरणा नदीला आलेल्या पूरामुळे संपर्क तुटतो. गावात आणि शेतीत पाणी शिरल्याने शेतकरी हवालदिल झाले. भातशेतीसाठी आणलेले बी–बियाणे आणि अवजारे देखील पाण्यात वाहून गेली. त्यामुळे पूर्वपट्टीत पूरस्थितीत गावांचा संपर्क तुटू नये म्हणून उपाययोजना करण्याची गरज आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी अशोक गावडे



“राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वेळोवेळी पाठबळ दिले. पक्षाला नवी मुंबईमध्ये अल्पावधीतच नवसंजीवनी प्राप्त करून देणार आहे. पक्षश्रेष्ठींच्या आदेशाने पुढील धोरण ठरवू.
– अशोक गावडे,
नवनिर्वाचित नवी मुंबई जिल्हाध्यक्ष

प्रतिनिधी
मुंबई

बदलत्या राजकीय घडामोडीमुळे नवी मुंबईतील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. भाजपाची पक्षप्रवेशाची ‘वेलकम ऑफर’ स्विकारत नवी मुंबईतील दिग्गज नेतेमंडळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. मात्र, याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खंदे समर्थक असलेले आणि नवी मुंबईचे माजी उपमहापौर राहिलेले अशोक गावडे यांच्या गळयात नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदाची सुवर्णमाळ सोमवारी ५ ऑगस्ट रोजी पडल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.

नवी मुंबईसारख्या स्मार्ट शहरात आपले अधिराज्य गाजवणाऱ्या नेतेमंडळींनी भाजप पक्षाला पसंती दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये पोकळी निर्माण झाल्याचा पोस्ट सोशल मीडियातून गेल्या काही दिवसांपासून व्हायरल होत आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एकहाती किल्ला असलेल्या नवी मुंबई शहराची धुरा यापुढे कोण पाहणार, अशा चर्चा रंगत आहे.

यातच राष्ट्रवादी काँग्रेसमधील मातब्बर नेते आणि राज्यातील सहकार क्षेत्रातील दिग्गज म्हणून ओळखले जाणारे नवी मुंबई महापालिकेतील नगरसेवक आणि माजी उपमहापौर अशोक गावडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली. यामुळे सोशल मीडिया आणि कार्यकर्त्यांचा मनात चाललेल्या चलबिचलतेला पूर्णविराम मिळाला आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे

### भर पावसात ‘आपण सारे भारतीय’ रॅली संपन्न




**वसई :** सर्वधर्म समभावाचे प्रतिक असलेली ‘आपण सारे भारतीय’ रॅली भर पावसातही उत्साहाने संपन्न झाली. नालासोपारा पूर्वेकडील चंदन नाक्यावरून सायंकाळी ५ वाजता निघालेल्या रॅलीचा तुळींज पोलीस ठाण्याजवळ समारोप झाला. देशात मॉब लिंचींगद्वारे मुस्लिम, दलित, आदिवासी महिलांवर सातत्याने अन्याय, अत्याचार होत आहेत. त्यावर योग्य उपाययोजना करण्यासाठी या रॅलीतून तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. समीर वर्तक यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या रॅलीत प्रवीण गायकवाड यांनी भारतीय संविधानाचे वाचन करून उपस्थित सर्वधर्मीयांकडून शपथ घेतली. तर ॲड. खलिल शेख यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

### श्रावणमासानिमित्ताने धार्मिक सोहळ्यास प्रारंभ

**डोंबिवली :** सालाबादप्रमाणे यंदाही सिद्धजलतपस्वी स्वामी श्री. गगनगिरी महाराजांच्या आवडत्या अशा निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या खोपोली आश्रमस्थानी नुकताच हजारो भाविकांच्या चैतन्यदायी उपस्थितीत मनभावन श्रावण महोत्सवास, होमहवनाचे कार्यक्रमाने प्रारंभ झाला. सदर महोत्सव संपूर्ण श्रावण महिनाभर सुरू राहणार असून या धार्मिक सोहळयाच्या अनुषंगाने आश्रमस्थानी दररोज होम–हवन, भंडारा (अन्नदान) कार्यक्रम होणार आहे. प्रत्येक श्रावणी रविवारी मान्यवरांची कीर्तने तसेच विविध भजनी मंडळांची सुस्वर भजने आणि नामस्मरण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक सोमवारी प्रासादिक आणि सिद्धिदायक ठरलेल्या श्री गुरुसप्तशती या पोथीचे सामुदायिक पारायणाचे आयोजनही करण्यात आले आहे. या महोत्सवाचा सांगता सोहळा ३० ऑगस्ट रोजी पिठोरी अमावास्येच्या दिवशी होम–हवनाच्या कार्यक्रमाने होणार आहे. अनेक व्रतवैकल्य, सण–उत्सवाने संपन्न असलेल्या श्रावणमासा निमित्ताने आयोजित धार्मिक उत्सवाला जास्तीत–जास्त भाविकांनी सहभागी होऊन सहकार्य करावे.

### डहाणूत रानभाज्या प्रदर्शन

**वसई :** पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. या भागात विविध प्रकारच्या रानभाज्या आढळतात. पूर्वी याच रानभाज्यांचा आहारात समावेश होत होता. परंतु कालानुरूप पौष्टिक रानभाज्यांचा वापर कमी होत गेला. नवी पिढी व शहरी लोकांना यांची माहिती होण्यासाठी, तसेच या सकस व भरपूर पोषक रानभाज्यांबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कृषि शिक्षण संस्थेने कोसबाड, डहाणू येथे ८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ४ या कालावधीत रानभाज्यांचे प्रदर्शन व रानभाज्या पाककृती स्पर्धेचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात आपण मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे विभागीय सचिव प्रभाकर राऊत तसेच कार्यक्रम समन्वयक विलास जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रुपाली देशमुख यांच्याशी ८६९८७०११७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### ३२ जवानांना मिलिटरी स्कूलमध्ये ट्रेनिंग सुरू

**ठाणे :** सुधागड तालुक्यातील २४ मुले व ७ मुली अशा एकूण ३२ जवानांना १ ऑगस्टपासून मेस्को ॲकेडमी सातारा येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. सुधागड तालुक्यातील मुलांना मिलिटरीमध्ये जाण्यासाठा तसेच प्रोत्साहन मिळण्यासाठी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे या संस्थेने टाटा कॅपिटल या कंपनीच्या सहकाऱ्यानेवरील संधी युवकांना प्राप्त करून दिली असून त्यासाठी सुधागड तालुका मराठा समाजाचे सहकार्य लाभले आहे. संस्थेचे सरचिटणीस राजू पातेरे व जीवन साजेकर हे मुलांसोबत सातारा येथे जाऊन प्रशिक्षणाची सुरुवात केली. सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांच्या मार्गदर्शनाने व कार्यकारी मंडळाच्या मेहनतीने सुरू केलेल्या या शिबिरासाठी, सुधागड मराठा समाज अध्यक्ष गणपत सितापराव व कार्यकारणींचे सहकार्य लाभले.

## बीएमटीसी कामगार आजही प्रतिक्षेत

**नवी मुंबई :** १९७० साली नवी मुंबईत सिडको आली. आणि नवीन शहर वसाविण्यासाठी उरण, पनवेल आणि नवी मुंबईतील शेतकऱ्यांची जमीन संपादित केली. त्याचबरोबर दळणवळण करण्याकरिता १९७२ मध्ये बेस्टच्या धर्तीवर सिडकोने बीएमटीसी ही परिवहन सेवा या परिसरात सुरू केली. मात्र, अवघ्या १२ वर्षांची सेवा पुरविल्यानंतर १९८४ मध्ये ही परिवहन सेवा सिडकोने बंद केली आणि १८०० कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. मात्र, बंद पडलेल्या सिडकोच्या बीएमटीसी परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांना सिडकोने योग्य मोबदला दिला नाही.

तेव्हापासून आजपर्यंत प्रलंबित मागण्यांसाठी लढा सुरू आहे. मात्र, आज तीस वर्षांचा काळ उलटून देखील या कामगारांची परवड ही सुरू आहे. तसेच त्यांना न्याय मिळाला नाही. कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्या म्हणून पाच वर्षांपूर्वी सरकारने आदेश दिले होते. मात्र, सरकारच्या आदेशाचे पालन करण्यात सिडको उदासीनता दाखवत आहे. त्यामुळे यावर कोणतीही कार्यवाही झाली न झाल्यामुळे कामगारांच्या मनात सिडकोविरोधात असंतोष निर्माण झाला आहे.

# गणेश नाईकांचा ‘मीडिया ट्राय’ फेल

## बहुतांशी नगरसेवकांचा राष्ट्रवादीत राहण्याचा निर्णय

प्रतिनिधी
नवी मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसचे नवी मुंबईतील नेते गणेश नाईक यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याआधी इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांतून, सुरू केलेली ट्रायल फेल गेली आहे. त्यामुळे, त्यांना सध्यातरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आश्रयाला रहावे लागणार आहे. नवी मुंबईत मोठा राजकीय भूकंप होणार असल्याची, बातमी सध्या सुरू असलेल्या पावसात वाहून गेल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

सेनेचा मानपान घेतल्यानंतर गणेश नाईक यांनी बाळासाहेबांना वृद्धापकाळात धोका देऊन, पवारांच्या राष्ट्रवादीत ते ढेरे दाखल झाले. युतीच्या सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असलेल्या नाईकांनी पक्ष वाढविण्यापेक्षा नवी मुंबईतच ठाण मांडून आपले बस्तान बांधले. सध्याच्या युती सरकारच्या काळात त्यांच्या कोट्यवधी किंमतीच्या बेकायदेशीर मालमत्तावर कारवाई करण्यात आली. शरद पवार याचे विरोधी पक्षाच्या नेत्यांशी असलेल्या संबंधामुळे, २०१५ मध्ये झालेल्या पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक प्रचारासाठी असलेल्या जाहीर सभेत नाईकांनी दगड खाणच्या माध्यमातून कोट्यवधीचा शासकीय महसूल लुटला असल्याचे, सांगत त्यांना लवकरच तुरुंगात टाकू अशी भीम गर्जना त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. नाईकांना भाजपात प्रवेश देण्याचा विचार करताना मुख्यमंत्री मात्र, नवी मुंबईत केलेली घोषणा विसरले असल्याचे दिसून येते. मुख्यमंत्री आपल्या वक्तव्याकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष करीत आहेत की, विसरल्याचे नाटक करीत आहेत हे न कळणारे कोडे नवीमुंबईकराना पडला आहे. संदीप नाईक यांच्या भाजप प्रवेशानंतर गणेश नाईक याचा देखील भाजपात एका इव्हेंट कार्यक्रमाच्या माध्यमातून भाजप प्रवेश होईल, असे प्रसारमाध्यमानी जाहीर करून टाकले ही सर्व खेळी नाईकांचीच होती अशी चर्चा सध्या सुरू आहे. राष्ट्रवादीचे सर्व नगरसेवक घेऊन भाजपात प्रवेश करण्याचे मनुसुबे खुद्द शरद पवार यांनी उधळून लावले.



**जाहीर नोटीस** निशाणी नं.१२

**एम.ए.सी.पी.नं.१०५६/२०१८** **ॲड.सागर मिसर**

**नाशिक येथील मे.मोटार ॲक्सि.,क्लेम ट्रिब्युनल सो.(जाधव मॅडम) नाशिक**
यांचे कोर्टात...

**श्रीमती प्रणाली पंढरीनाथ भागडे, वगैरे** ) **अर्जदार**

**विरूध्द**

**१) श्री.सचिन बिन्द्रेश गुप्ता** )
रा.गाळा नं.९, राजेश हॉटेलमागे, जय अंबे नगर,मोती नगर, ) **सामनेवाले**
भाईंदर पश्चिम,ठाणे,भाईंदर पश्चिम एस.ओ.,ठाणे-४०११०१ )

ज्याअर्थी अर्जदार यांनी सा.वाले विरुध्द मो.ॲक्सी क्लेम ट्री. सो. यांचे कोर्टात नुकसान भरपाई मिळण्यास अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाच्या कामात तुम्ही सा.वाले नं.१ यांना उपरोक्त पत्त्यावरती समन्स काढले असता सदरचा पत्ता अपुरा आहे, या कारणाने न बजावता परत आलेले आहे. त्यामुळे बजावणी होवू शकलेली नाही. त्याअर्थी जाहीर नोटीसव्दारे अर्जास जबाब देण्याकामी **दि.२०/०९/२०१९ रोजी सकाळी ११ वाजेस** हजर राहावे. तसे न केल्यास आपणांस काहीही सांगावयाचे नाही, असे समजून तुमचे विरुध्द तुमचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज चालविण्यात येवुन योग्य तो पुढील आदेश केला जाईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस आज ता.०५/०८/२०१९ रोजी माझे सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केली असे.

सही/- **क.लिपिक,** मे.मोटार ॲक्सी.क्लेम. ट्रायब्युनल सो.
कोर्टाचा शिक्का
सही/- **अधिक्षक,** मे.मोटार ॲक्सी. क्लेम ट्रायब्युनल सो.

## नालासोपारात गढूळ पाणीपुरवठा

**वसई :** नालासोपारात गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या निषेधार्थ शिवसेनेने भर पावसात महापालिकेवर मोर्चा काढला. शहरात कमी दाबाने आणि तोही गढूळ पाणीपुरवठा होत असल्यामुळे शहरप्रमुख संतोष टेंबवलकर यांच्या नेतृत्वाखाली विभागीय कार्यायल नालासोपारावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना घेराव घालून निवेदन देण्यात आले. शहराला चांगल्या दाबाने, स्वच्छ पाणी येत्या आठ दिवसांत न पुरवल्यास पालिकेचा चक्का जाम करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## पूरबाधितांना आधार फाउंडेशनचा मदतीचा हात

**नवी मुंबई :** मागील दोन दिवस पडत असलेल्या पावसामुळे झोपडपट्टी जलमय होणार नाहीतर नवलच! अशाच नवी मुंबईमधील एका झोपडपट्टीत भरलेल्या पाण्यामुळे नागरिकांना जेवण मिळणे लांबच! याची जाणीव ठेऊन सामाजिक क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या आधार फाउंडेशनने जेवणाचे साहित्य देऊन झोपडपट्टीत वास्तव्य करणाऱ्या नागरिकांची भूक भागवली.

तुर्भे परिसरातील कृष्णा स्टील नावाची झोपडपट्टी आहे. या झोपडपट्टीत शनिवारी पाणी घुसल्याने सर्व घरामध्ये पाणीच पाणी झाले होते. त्यामुळे महिलावर्गाला जेवण करणे जिकरीचे होते. घरातील लहान मूल, वृद्ध नागरिक भुकेने व्याकुळ झाले होते. याची माहिती आधार फाउंडेशन नवी मुंबईचे अध्यक्ष मधुकर शिंदे यांना मिळाली. त्यांनी रात्री नऊच्या सुमारास आपल्या सहकाऱ्यांना एकत्र घेऊन कृष्णा स्टील झोपडपट्टी गाठली. त्यानंतर तिथे भुकेने व्याकुळ असणाऱ्या १५० नागरिकांना आणलेले अन्न देऊन त्यांची तृप्ती केली.

**EMERALD LEISURES LIMITED**
(FORMERLY KNOWN AS
**“APTE AMALGAMATIONS LIMITED”**)
**Reg. Off**:- Club Emerald Sports Complex, Plot No. 366/15, Swastik Park, Near Mangal Anand Hospital, Chembur, Mumbai – 400 071
**CIN**: L74900MH1948PLC006791
**Website**: www.apteindia.com,
**Tel No.**: +91 22 2526 5800

Notice is hereby given that pursuant to Regulation 29 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 with the Bombay Stock Exchange, a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Wednesday, 14th August, 2019 at 3.00 p.m. at the registered office of the Company, inter alia, to consider and approve the Unaudited Financial Results for the quarter ended 30th June, 2019.

The copy of the notice is also available on the website of the Company, www.apteindia.com and also on the website of BSE Limited, www.bseindia.com

By the Order of the Board of Director's
**Emerald Leisures Limited**
Sd/-
Rajesh Loya
Whole Time Director
Place : Mumbai
Dated : August 05, 2019
DIN: 00252470

**इण्डोकेम लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय प्लॉट नं. ४१०/४११,
खताऊ हाऊस, मोगुल लेन,
माहिम मुंबई : ४०० ०१६
सीआयएन : **L31300MH1964PLC013088**
दूरध्वनी क्र. : ६१२३६७६७/६१२३६७११
ईमेल आयडी : iklsecretarial@gmail.com

**सूचना**

याव्दारे सूचना देणेत येते की, सेबीच्या रेग्युलेशन २९ आणि ४७ नुसार (लिस्टींग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या अन्वये इतर कामकाजाव्यतिरिक्त दिनांक ३० जून २०१९ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीचे स्वतंत्र अलेखपरिक्षित वितीय निष्कर्ष आणि त्यावरील मर्यादित पुनरावलोकन अहवाल विचारात घेण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा सोमवार दि. १२ ऑगस्ट २०१९ रोजी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात दुपारी ४.०० वा घेण्यात येणार आहे. सदर माहिती बीएसई लिमिटेडच्या वेबसाईटवर www.bseindia.com जेथे कंपनीचे समभाग सूचिबध्द आहेत तेथे तसेच कंपनीची वेबसाईट www.indokem.co.in वरही उपलब्ध आहे.

**इण्डोकेम लिमिटेडकरिता**
सही/-
**राजेश डी. पिसाळ**
**कंपनी सचिव**
स्थळ : मुंबई
दिनांक : ६ ऑगस्ट २०१९

Weizmann Forex
**WEIZMANN FOREX LIMITED**
**CIN : L65990MH1985PLC037697**
**Regd. Office :** 214, Empire House, Dr. D. N. Road, Ent. A. K. Nayak Marg, Fort, Mumbai - 400 001.
**Corporate Office:** Forbes Building, Ground Floor, Charanjit Rai Marg, Fort, Mumbai – 400001
Website: www.weizmannforex.com,
Email : investorsgrievance@weizmannforex.com
Tel. Nos : 22071501 ( 6 lines) Fax No.: 22071514

**NOTICE**

NOTICE is hereby given that pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (Listing Regulations) that pursuant to Regulation 33 of Listing Regulations, a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Wednesday, 14th August, 2019, inter alia, to consider, approve and take on record Un-audited Financial Results of the Company for the quarter ended 30th June, 2019.

The information contained in this Notice is also available on the website of the Company ie. www.weizmannforex.com and also on the website of the Stock Exchanges, where shares of the Company are listed ie. www.bseindia.com and www.nseindia.com.

**By order of the Board of Directors**
**For WEIZMANN FOREX LIMITED**
**Sd/-**
**Sushama Kadam**
**Company Secretary**
**Place: Mumbai**
**Date : 05.08.2019**

**P.H. CAPITAL LIMITED**

**Regd. Office :** 5 D Kakad House, 5th Floor, A Wing, New Marine Lines, Opp. Liberty Cinema, Mumbai - 400 020 . Email :phcapitalltd@gmail.com, Tel. : 022 -2201 9473 / Fax. : 022- 2201 2105
**CIN : L74140MH1973PLC016436**

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED ON 30TH JUNE 2019.**
**(₹ In Lacs except per share data)**

| Sr. No. | Particulars | QUARTER ENDED 30/06/2019 (Unaudited) | 30/06/2018 (Unaudited) | 31/03/2019 (Audited) | Year Ended 31.03.2019 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations (Net) | 1,696.17 | 1,965.17 | 830.06 | 5,154.71 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 177.94 | (58.94) | (21.31) | (34.34) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary & Exceptional items) | 131.01 | (87.65) | 31.35 | (43.92) |
| 4 | Total Comprehensive Income for the period (comprehensive profit for the period (after Tax and other comprehensive income after tax) | 131.01 | (87.65) | 31.35 | (43.92) |
| 5 | Paid up Equity Share Capital of ₹ 10/- | 300.01 | 300.01 | 300.01 | 300.01 |
| 6 | Reserves | - | - | - | - |
| 7 | Earnings Per Share not annualised (FV of ₹ 10/- each) Basic & Diluted | 4.37 | (2.92) | 1.05 | (1.46) |
| 8 | Earnings Per Share (after extraordinary items) (of ₹ 10/- each) Basic & Diluted | 4.37 | (2.92) | 1.05 | (1.46) |

**Notes:**
1) The above is an Extract of the detailed format of Quaterly Unaudited financial results filed with the Stock Exchange under regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirments) Regulation, 2015. The full format of the Quartely / Annual Audited Financial Results are available on the Stock Exchange Website. (www.bseindia.com)
2) The above results were reveiwed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 05th Augsut, 2019.

**FOR P.H.CAPITAL LTD.**
**Rikeen P. Dalal**
**DIN : 01723446**
**Director**
**Date : 05/08/2019**
**Place: Mumbai**

## वीजवितरणाच्या मनमानी कारभाराबाबत मुख्यमंत्र्याकडे तक्रार

**नवी मुंबई :** कोणतीही नोटीस अथवा माहिती न देता ग्राहकाचे मीटर काढून नेले असता, खारघरमधील रहिवाशी एस. कुमार यांनी महावितरणच्या या मनमानी कारभाराची थेट मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.

महावितरणचे कर्मचारी स्वत:च्या फायद्यासाठी ग्राहकांना वेठीस धरत असून अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई गरजेचे आहे, असे कुमार यांनी निवेदनात नमूद केले आहे. एस. कुमार हे खारघर सेक्टर १० मधील केसर एक्झोटिका इमारतीत राहत असून त्यांच्याबरोबर सदर प्रकार घडल्याने या प्रकरणी कठोर पाऊल उचलले. ६ जुलै रोजी एस. कुमार काही कामानिमित्त बाहेर गेले असता, खारघर सबस्टेशनमधील गोपाल बारी या कर्मचाऱ्याने त्यांच्या घराची लाईट कट करत त्यांचे मीटर काढून नेले. एस. कुमार यांचा संपर्क व्हावा, म्हणून त्याने त्याचा मोबाईल नंबर इमारतीच्या सुरक्षा रक्षकाकडे दिला. आपले काम आटोपून कुमार घरी आले असता त्यांना, घरातील लाईट बंद असल्याचे आढळून आले. त्यावेळी वितरणच्या कर्मचाऱ्यांनी सदर प्रकार घडवून आणला असल्याचा आरोप करत या मनमानी कारभाराला चाप बसने गरजेचे असल्याचे कुमार यांनी स्पष्ट केले.

**REPRO INDIA LIMITED**
CONTENT AGGREGATION TO EFFECTIVE DISSEMINATION
**Regd. Office:** 11th Floor, Sun Paradise Business Plaza, B Wing, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai - 13.
Tel: +91-22-71914000 Email: investor@reproindialtd.com
Fax: +91-22-71914001 Website: www.reproindialtd.com
CIN: L22200MH1993PLC071431

**NOTICE OF ANNUAL GENERAL MEETING**

**NOTICE** is hereby given that the 26th Annual General Meeting ('AGM') of the Members of the Company is scheduled to be held on **Saturday, August 31, 2019 at 11.30 a.m.** at M.I.G. Cricket Club, Galaxy Hall, 2nd Floor, M.I.G. Colony, Bandra (East), Mumbai - 400 051, to transact the Ordinary and Special businesses, as set out in the Notice of the AGM along with Explanatory Statement pursuant to Section 102 of the Companies Act, 2013 ('the Act').

Pursuant to the provisions of Section 101 of the Companies Act, 2013 read with Rule 18 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, Regulation 36 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and Secretarial Standard on General Meetings (SS-2), the Notice of the 26th AGM along with the Annual Report, Proxy Form, Ballot Form and Attendance Slip of the Company for the Financial Year 2018-19, has been sent in electronic mode to those Members whose e-mail IDs are registered with the Registrar and Transfer Agent (RTA), Company or the Depository Participants for communication purposes. The physical copy of the same has been sent to the Members whose names appeared in the Register of Members / Register of beneficial owners by permitted mode individually at their postal address to those members whose e-mail IDs are not registered. The dispatch of Annual Reports/e-communication to Members has been completed on August 5, 2019.

The Notice of AGM, Annual Report and other related documents are also available on the Company's website. Members who have not received the Notice and Annual Report may download the same from the website of the Company www.reproindialtd.com.

The documents pertaining to the items of the business to be transacted in the AGM are open for inspection by Members at the Registered Office of the Company during the normal business hours on all working days (except Saturdays, Sundays and National Holidays) between 03.00 p.m. to 5.00 p.m. upto the date of the AGM of the Company.

Pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013 and Rule 10 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and in accordance with Regulation 42 of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015, the Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from August 25, 2019 to August 31, 2019 (both days inclusive).

Pursuant to provisions of Section 108 of the Companies Act, 2013 and read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended by the Companies (Management and Administration) Amendment Rules, 2015 (including any statutory modification(s), clarification(s), exemption(s) or re-enactment(s) thereof for the time being in force), Regulation 44 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015 and SS-2, the Company is providing to its Members a facility to cast their vote electronically from a place other than the venue of the AGM (“remote e-voting”) using an electronic voting system provided to its members holding shares in physical or dematerialized form, as on the cut-off date, i.e. Saturday, August 24, 2019. The Company has engaged the services of Link Intime India Private Limited (LIIPL) for providing remote e-voting facilities in a secure manner and has appointed Mr. Dinesh Kumar Deora, (Membership No. FCS: 5683) Practising Company Secretary, as the Scrutinizer for conducting the voting process in a fair and transparent manner.

Once the vote on a resolution is cast by a member, any subsequent changes shall not be allowed.

The voting rights of the members shall be in proportion to their shares in the paid-up Share Capital of the Company as on the cut-off date, being Saturday, August 24, 2019.

The details pursuant to the provisions of the Act and the said Rules are provided herein below:

1. Date and time of commencement of remote e-voting: Wednesday, August 28, 2019 at 9:00 a.m.
2. Date and time of end of remote e-voting: Friday, August 30, 2019 at 5:00 p.m.
3. The e-voting facility will not be provided beyond August 30, 2019 after 5:00 p.m.
4. The date of completion of sending notice: August 5, 2019
5. Cut-off date as on which the right of voting of the Members shall be reckoned: Saturday, August 24, 2019.
6. In case a person has become the Member of the Company after the dispatch of the Notice but on or before the cut-off date i.e. Saturday, August 24, 2019, may write to LIIPL at the contact details mentioned below.
7. A Member as on the said cut-off date shall only be entitled for availing the remote e-voting facility or vote through physical ballot at the AGM. The Members who have cast their vote electronically cannot vote at the AGM. If a Member casts votes by both modes then voting done through e-voting shall prevail and ballot shall be treated as invalid.
8. In the of provisions of Section 107 of the Companies Act, 2013, since the Company is providing the facility of remote e-voting to the Members, there shall be no voting by show of hands at the AGM.
9. In case of any queries or issues regarding e-voting, please refer the Frequently Asked Questions (“FAQs”) and e-voting manual available at https://instavote.linkintime.co.in under help section or write an email to enotices@linkintime.co.in or call on: Ph: 022-49186000.

The entry to the meeting venue will be regulated by Attendance Slips, which have been sent along with the Annual Report to the Members. Members who have received Attendance Slips by electronic mode are requested to print the Attendance Slip and submit a duly filled in Attendance Slip at the registration counter to attend the AGM. Please note that duplicate Attendance Slips will not be issued.

For any queries, requests for copies of annual reports or investor grievances, contact:
Ms. Kajal Damania
Company Secretary & Compliance Officer
Repro India Limited
11th Floor, Sun Paradise Business Plaza,
B Wing, Senapati Bapat Marg, Lower Parel,
Mumbai – 400 013 Ph: 022-71914000
Email Id: investor@reproindialtd.com

**By order of the Board of Directors**
**For Repro India Limited**
**Sd/-**
**Kajal Damania**
**Company Secretary & Compliance officer**
**Place : Mumbai**
**Date : August 5, 2019**

तरुण भारत संवाद
खज़ाना
बुधवार दि. ०७ ऑगस्ट २०१९
डीडीटी




याशिवाय : ज्ञानकिरण, जगाच्या पाठीवर, शोधयात्रा, फक्त हसा, छोटी मूर्ती मोठी कीर्ती, फिल्मी किस्से, विचारधन, वास्तुशास्त्र, रसगंधा, एसएमएस वर्ल्ड, तुमचे ग्रह आमचा अंदाज इ. वाचनीय व ज्ञानवर्धक मजकूर.